|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि.८ (  ) विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश आणि नवीन महाराष्ट्र विद्यापीठ कायदयात करण्यात आलेली तरतूद यामुळे पदवी स्तरावर पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती (चॉईस बेसड क्रेडिट सिस्टीम) लागू करणे अनिवार्य असून या पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा फायदा होणार असल्याचे प्रतिपादन नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.जी.एन.शिंदे यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदवी स्तरावर या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गासाठी चाईस बेसड् क्रेडिट सिस्टीम लागू करण्यात येत असून यासंदर्भात सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांची कार्यशाळा आजा शुक्रवार, दि.८ जून रोजी विद्यापीठाच्या अधिसभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा.शिंदे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित होते.

प्रा.शिंदे यांनी या कार्यशाळेत कला,वाणिज्य व विज्ञान शाखानिहाय माहिती देताना पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती विशद केली. आताच्या काळात शिक्षण हे शिक्षकाभिमुख राहिलेले नसून विद्यार्थीभिमुख झाले आहे. त्यामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे. पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दतीमुळे कौशल्य आणि ज्ञान यांचा संगम होऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात मोठा फरक पडेल. एका कॉलेजमधून दुसऱ्या कॉलेजमध्ये अथवा एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात विद्यार्थी जावू शकतो. त्याचे श्रेयांक (क्रेडिट ) हस्तांतरीत होतील त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोर अभ्यासक्रम, क्षमता वाढ, कौशल्य हे ढोबळ मानाने वैकल्प विद्यार्थ्यांना उपलब्ध असतील असे ते म्हणाले. प्रा.शिंदे यांनी यावेळी उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी ही पध्दत या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षासाठी अत्यंत परिणामकारकपणे लागू केली जाणार असून सर्व विषयांच्या अभ्यास मंडळांनी याबाबत पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. प्रारंभी प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी केले.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि. ८ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्र आणि लायब्ररी इर्न्फोमेशन सायन्स स्टडी सर्कल यांच्या संयुक्त विद्यमाने उदया शनिवार, दि. ९ जून, २०१८ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ आणि ग्रंथपालांची भूमिका या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र प्रशाळेच्या सभागृहात ही कार्यशाळा होणार असल्याची माहिती ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ.अनिल चिकाटे व स्टडी सर्कलचे सचिव डॉ.सुधीर पाटील यांनी दिली.

---

जा.क्र . : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ८ जून, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**स्वाक्षरीत प्रत/-**

**(डॉ.सुनील पाटील )**